**<u>अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर महसूली जमा परताव्याची देयके सादर करणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,**
**शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अविप्र १०.०८/प्र.क्र.१४/अर्थसंकल्प-४,**
**दिनांक ६.११.२००८**

**<u>परिपत्रक</u>**

महसूली जमा रकमांच्या परताव्याची देयके सादर करतांना कोषागारांकडून अर्थसंकल्प वितरण प्रणालीवरील प्राधिकारपत्राची मागणी करण्यात येत असल्याने देयके पारित होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. ही बाब लक्षात घेऊन आता या परिपत्रकान्वये पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

महसूली जमा परताव्याची बाब ही खर्चाची बाब नसल्याने याकरिता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवरील प्राधिकारपत्राची आवश्यकता नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( सु.प्र.कानडे)
सहसचिव, वित्त विभाग